# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## मंगळवार, दिनांक १८ जुलै, २०२३

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक** : **प्रश्नोत्तरे.**

**दोन** : **कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

**उप मुख्यमंत्री** : "महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा सतरावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन** : **विधानपरिषद नियम समितीचा अहवाल सभागृहास सादर करणे.**

**चार** : **सदस्य- नियम समिती यांचा प्रस्ताव :-**

विधानपरिषद नियम समितीच्या आज दिनांक १८ जुलै, २०२३ रोजी सभागृहास सादर करण्यात आलेल्या अहवालाच्या अनुषंगाने नियम समितीच्या अहवालातील शिफारशींमध्ये सुधारणा करण्याची नोटीस देण्यासंबंधातील नियम २१९ (१) मधील दहा दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती नियम २८९ अन्वये स्थगित करण्यात येऊन सदरहू मुदत उक्त अहवालाच्या बाबतीत पाच दिवसांची करण्यात यावी.

**पाच** : **म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास).**

**सहा** : **लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

(१) **श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्य परिवहन महामंडळाने आरामदायी प्रवासासाठी प्रवाशांच्या सेवेत आणलेली शिवशाही बस सुविधांपेक्षा अपघातांमुळे जास्त चर्चेत येणे, गेल्या काही दिवसांमध्ये शिवशाही बसला आग लागण्याच्या आणि अपघात होण्याच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ झाली असणे, शिवशाही बसचे आतापर्यंत छोटे-मोठे ४०० पेक्षा जास्त अपघात झाले असणे, या अपघातांमध्ये महामंडळाच्या मालकीच्या शिवशाही बसचे अपघात जास्त असणे, सध्या महामंडळाच्या स्वमालकीच्या ९०० शिवशाही असून त्यापैकी ६०० बस प्रत्यक्ष रस्त्यावर धावत असणे, ९० शिवशाही भाडेतत्वावर असणे, शिवशाही बसेस प्रामुख्याने मुंबई-सातारा, बोरिवली-सातारा, नाशिक-शिवाजीनगर (पुणे) व कोल्हापूर-स्वारगेट (पुणे) या मार्गावर धावत असणे, शिवशाही प्रवासी भाडे साध्या बसपेक्षा २५ टक्के जास्त असणे, मार्गस्थ बिघाड, छोटे-मोठे अपघात, खाजगी चालकांचे

गैरवर्तन, पुशबॅक सीट, वातानुकूलित यंत्रणा अशा प्रवासीभिमुख सोईसुविधांचा बोजवारा उडाला असणे, शिवशाही बसला नादुरुस्ती व मार्गस्थ बिघाडीचे ग्रहण लागले असणे, कंत्राटी पध्दतीने चालकांची भरती यामुळे वाढते अपघाताचे प्रमाण, शासनाने एस.टी. महामंडळाच्या शिवशाही बसच्या समस्यांबाबत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री विलास पोतनीस,** सुनिल शिंदे, अमोल मिटकरी, विक्रम काळे, सतिश चव्हाण, सत्यजीत तांबे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मरिन ड्राइव्ह, मुंबई येथील सावित्रीबाई फुले वसतिगृहातील विद्यार्थिनीची तेथील सुरक्षारक्षकाने हत्या करून स्वत: आत्महत्या केल्याची संतापजनक घटना दिनांक ०७ जून, २०२३ रोजी उघडकीस येणे, वांद्रे येथील पॉलिटेक्निकल महाविद्यालयात शिकणारी अकोल्याची ही १९ वर्षीय विद्यार्थिनी सावित्रीबाई फुले वसतिगृहात चौथ्या मजल्यावर वास्तव्यास असणे, परीक्षा नुकतीच संपली असल्याने दोन दिवसांनी आपल्या मूळ गावी अकोला येथे जाणार असणे, परंतु तत्पूर्वीच वसतिगृहाच्या सुरक्षारक्षकाने तिच्यावर बलात्कार करून तिची हत्या करून स्वतः ग्रॅण्ट रोड स्थानकानजिक रेल्वेगाडीखाली आत्महत्या केली असणे, सदरहू घटनेने वसतिगृहाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उभे राहिले असणे, संबंधित सुरक्षारक्षकाने यापूर्वी पहाटेच्या सुमारास तिच्या खोलीत घुसण्याचा प्रयत्न केला असणे, त्याला खोलीत पाहून विद्यार्थिनीला धक्का बसला असणे, याबाबतची तक्रार संबंधित विद्यार्थिनी आणि तिच्या पालकांनी वसतिगृहाच्या वॉर्डन आणि अधीक्षकांकडे करूनही त्यांनी सदर तक्रारीकडे अक्षम्य दुर्लक्ष केलेले असणे, या वसतिगृहाची क्षमता ४५० विद्यार्थीनींची असून सध्या या वसतिगृहात ४० ते ४५ विद्यार्थीनी वास्तव्यास असून गेल्या वर्षभरापासून तेथील सीसीटीव्ही यंत्रणा बंद असल्याची बाब उघडकीस येणे, सदरहू वसतिगृहाच्या ढिसाळ कारभारामुळे एका विद्यार्थिनीचा नाहक गेलेला बळी, सदरहू वसतिगृहाच्या वॉर्डन आणि अधीक्षकांना निलंबित करण्याची संबंधित विद्यार्थिनीच्या पालकांनी केलेली आग्रही मागणी, सदरहू घटनेमुळे राज्याच्या कानाकोपऱ्यातून शिक्षणासाठी आणि नोकरीसाठी येणाऱ्या मुलींच्या सुरक्षिततेचा निर्माण झालेला गहन प्रश्न, परिणामी, मुलींमध्ये पसरलेले भीतीचे वातावरण, यास्तव सदरहू घटनेची गंभीर दखल घेऊन सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची गरज, मुंबईसह राज्यातील मुलींच्या वसतिगृहात त्यांच्या सुरक्षिततेबाबत करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री सतिश चव्हाण,** विक्रम काळे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मृद व जलसंधारण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मौजे बोलेगाव (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) परिसरातून शिवना नदी वाहत असणे, नदीचे पात्र ३०० मीटरचे असणे, शिवना नदीवर बोलेगाव येथे कोल्हापुरी बंधाऱ्याचे बांधकाम सन २००६ मध्ये इंण्डो जर्मन अर्थ सहाय्यातून झाले असणे, बंधाऱ्याच्या बांधकामाचा त्यावेळेचा खर्च १५५ लक्ष रुपये असणे, बंधाऱ्याच्या पाणी साठयामुळे परिसरातील किमान ५० विहिरींची पाणी पातळी वाढली असणे, तर किमान २५० हेक्टर सिंचनात वाढ झाली असणे, मागील वर्षी अति पावसामुळे शिवना नदीवरील बोलेगाव येथील कोल्हापुरी बंधारा वाहून गेला असणे, सदर बंधाऱ्याची दुरुस्ती करण्यासाठी ग्रामस्थांनी वेळोवेळी मागणी केली असणे, शासनाने बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी माहे मार्च, २०२२ मध्ये ४८८ लक्ष रुपयांची मान्यता दिली असून मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेंतर्गत बंधाऱ्याच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले असणे, बंधाऱ्याचे चालू असलेले काम निकृष्ट व दर्जाहीन होत असल्याने काम पूर्ण होण्याआधीच बंधाऱ्याच्या भिंतीस भेगा पडलेल्या असणे, सुरक्षा भिंतीला तडे गेले असणे, त्यामुळे परिसरातील नागरिकांनी बांधकाम थांबवले असणे, बंधाऱ्याच्या आतील काम गॅबीयन ऐवजी सिमेंटचे करण्याची शेतकऱ्यांची मागणी असणे, तसेच बंधाऱ्याची लांबी व उंची वाढविण्याचीही मागणी होत असणे, निकृष्ट काम होत असल्याने बंधारा पुन्हा वाहून जाण्याची भिती असणे, झालेल्या सर्व्हेनुसार काम होत नसणे, बंधाऱ्याच्या भिंतीची लांबी व उंची वाढवणे तसेच गॅबीयन ऐवजी सिमेंटचे बांधकाम करण्यासाठी होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली कार्यवाही व प्रतिक्रिया."

(४) **ॲड.निरंजन डावखरे,** सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, रमेशदादा पाटील, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पालघर तालुक्यातील अतिदुर्गम आदिवासी परिसरात येणाऱ्या कोसबाड वरठापाड्यातील शाळकरी मुले व तेथील ग्रामस्थांना पावसाळ्यात नाला ओलांडताना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत असणे, पूल मंजूर असूनही २० वर्षांपासून तो लालफितीत अडकला असल्याने तेथील आदिवासी शाळकरी विद्यार्थी, गर्भवती माता व तेथील ग्रामस्थांचे प्रचंड हाल होत असणे, प्रशासन देखील कोणतीही दखल घेत नसल्यामुळे सदर ठिकाणी एखादी दुर्दैवी घटना घडण्याची शक्यता असणे, मनोर-विक्रमगड रस्त्यालगत कोसबाड ग्रामपंचायतीच्या हद्दीतील आदिवासी वस्ती असलेल्या वरठापाड्यातील मुलांना शाळेसाठी कोसबाड काचपाडा येथे तीन किलोमीटर पायपीट करावी लागणे, मात्र पावसाळ्यात चार महिने नदीचे रूप धारण केलेल्या नाल्यामध्ये असलेल्या बंधाऱ्याच्या कठड्यावरून पाण्यातून जीव मुठीत घेऊन शाळेत जावे लागणे, गर्भवती महिला किंवा आजारी व्यक्तीला झोळी करून उपचारासाठी घेऊन जावे

लागत असणे, पावसात अनेकदा दुसऱ्या गावाशी संपर्कही तुटणे, तेथील महिला-पुरुषांनाही जीवनावश्यक वस्तू आणण्यासाठी, दवाखान्यात वा इतर कामासाठी त्याच नाल्यातून जीवघेणा प्रवास करावा लागणे, शासनाने या प्रकरणी लवकरात लवकर पुलाचे काम सुरू करुन आदिवासींची होणारी गैरसोय थांबवावी, अशी मागणी ग्रामस्थ करीत असणे, याबाबत शासनाने तात्काळ निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**सात : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास)**

## - मध्यंतर —

**आठ : शासकीय विधेयक —**

**विधानसभेने संमत केल्यास — विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १९ - महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०२३

---------------------------------------------------------------------------------------

**नऊ : सर्वश्री विक्रम काळे,** प्रविण दरेकर, चंद्रशेखर बावनकुळे, रामराजे नाईक-निंबाळकर, निलय नाईक, प्रसाद लाड, सतिश चव्हाण, सुरेश धस, रामराव पाटील, अनिकेत तटकरे, रणजितसिंह मोहिते-पाटील, अमोल मिटकरी, प्रा.राम शिंदे, सर्वश्री प्रविण दटके, गोपिचंद पडळकर, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री श्रीकांत भारतीय, रमेश कराड, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"अल निनोचा प्रभाव, सरासरीपेक्षा पाऊस कमी होण्याची शक्यता व उशिराने झालेले पावसाचे आगमन, यामुळे राज्यातील शेतकऱ्यांवर दुबार वा तिबार पेरणीची वेळ येण्याची शक्यता लक्षात घेऊन शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करण्याची भूमिका शासनाने घेतली असणे, याबाबतच्या उपाययोजना युध्दस्तरावर करण्याची आवश्यकता असणे, राज्यातील बहुतांश लोकांचे जीवन कृषी क्षेत्राशी निगडीत असल्याने शेती हे अन्नधान्य, रोजगार व उपजीविकेचे साधन असणे, राज्यातील शेतकरी समर्थ व स्वावलंबी व्हावा, यासाठी शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून शेतीचे उत्पादन व शेतकऱ्यांचा आर्थिक विकास या धोरणाला विद्यमान शासनाने परमोच्च स्थान दिले असणे, शेतकरी स्वयंनिर्भर व्हावा या उद्देशाने विविध नवनव्या योजना विद्यमान शासनाने हाती घेतल्या असणे, जलसंधारणाच्या सर्वाधिक योजना यशस्वीपणे राबविण्यात महाराष्ट्र हे देशात प्रथम क्रमांकाचे राज्य ठरले असणे, पाणी अडवून, जमिनीत जिरवणे गरजेचे असल्याने जलयुक्त शिवार योजना टप्पा २ राबवण्याचा निर्णय सरकारने

घेतला असून ५४५ कोटी रुपयांची तरतूद केली असणे, अर्थसंकल्पातील "पंचामृत" संकल्पनेत "शाश्वत शेती – समृध्द शेतकरी " हे प्रथम अमृत असून त्याअनुषंगाने राज्यातील पीक विमा योजना व्यापक प्रमाणात राबविली जात असणे, कृषी क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढविणे, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना पुढे सुरु ठेवणे, पशुजैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे येथे लम्पी चर्मरोग प्रतिबंधक लस निर्मिती सुरु करणे, छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेच्या उर्वरित पात्र शेतकऱ्यांना त्यांचे लाभ देणे, उत्पन्न वाढीसाठी कोकणात काजू बोंड प्रक्रिया केंद्रे स्थापन करणे, कृषी व संलग्न क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे उपयोजन व प्रसारण करण्यासाठी नागपूर येथे डॉ.पंजाबराव देशमुख कृषी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय कृषी सुविधा केंद्र स्थापन करणे, नागपूर, काटोल, कळमेश्वर, बुलढाणा इत्यादी जिल्ह्यात आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्र उभारणे इत्यादी धोरणे कार्यान्वीत करण्यात आली असणे, हळद पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी हिंगोली जिल्ह्यात "बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्राची" स्थापना करण्यात आली असणे, शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी "मिशन—२०२५ " कार्यक्रम हाती घेतला असणे व त्याअंतर्गत पुढील ३ वर्षात ३० टक्के कृषी वीज वाहिन्यांचे सौरऊर्जीकरण अपेक्षित असणे, संयुक्त राष्ट्र संघाच्या घोषणेस अनुसरून राज्यात महाराष्ट्र पौष्टिक तृणधान्य अभियान राबविण्यात येणे, शेतकऱ्यांच्या घरी जाऊन गोवंश पशुधनाचे संपूर्णतः मोफत प्रतिबंधात्मक लसीकरण करण्यात येणे, नमो शेतकरी महासन्माननिधी योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून शेतकऱ्यांना मिळणाऱ्या प्रति शेतकरी व प्रतिवर्षी ६ हजार रुपयात राज्य सरकारने आणखी ६ हजार रुपयांची भर घातली असणे, महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्त योजनेअंतर्गत नियमित पीक कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत राज्य शासनाकडून प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणे, पंतप्रधान पीक विमा योजनेच्या प्रिमियमचा भार शेतकऱ्यांवर पडू नये, यासाठी शेतकरी हिश्याचा भार उचलण्याचा व शेतकऱ्यांना फक्त १ रुपयात पीक विमा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेतला असणे, शेतीच्या शाश्वत विकासासाठी महाकृषी विकास अभियान राबविण्यात येणे, "मागेल त्याला शेततळे" योजनेच्या धर्तीवर "मागेल त्याला फळबाग, ठिबक सिंचन, शेततळ्याचे अस्तरीकरण, शेडनेट, हरितगृह, आधुनिक पेरणी यंत्रे व कॉटन श्रेडर" हे घटक उपलब्ध करण्यात येणे, महाराष्ट्रातील काजूच्या सर्वंकष विकासासाठी "काजू फळपिक विकास योजना" लागू करण्याचा निर्णय सरकारने घेतला असणे, अमरावती येथे महत्वाकांक्षी प्रधानमंत्री मेगा इंटिग्रेटेड टेक्सटाईल रीजन अँड अपेरल (PM MITRA) पार्कचे लोकार्पण नुकतेच झाले असणे, विदर्भ, मराठवाड्यासह राज्यातील कापूस उत्पादकांना उत्पन्नवाढीची संधी मिळणार असणे, तसेच, या प्रकल्पामुळे राज्यात गुंतवणूक व रोजगार निर्मितीत मोठी भर पडणार असणे, गोपीनाथ मुंडे शेतकरी सुरक्षा सानुग्रह

अनुदान योजना राज्यात राबवून अपघातग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयास २ लाख रुपयांपर्यंत सानुग्रह अनुदान देणे, नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याकरिता माहिती तंत्रज्ञानाची मदत घेऊन मोबाईलद्वारे ई-पंचनामा करण्याची प्रक्रिया राबविण्यात येणे, देशी गोवंशाचे संवर्धन, संगोपन व संरक्षण होण्याकरिता महाराष्ट्र गोसेवा आयोगाची स्थापना करण्यात आली असणे, या आयोगाच्या माध्यमातून "गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजना" आणि "गोमाई मूल्यवर्धन योजना" या योजना राबविण्याचे प्रस्तावित असणे, राजे यशवंतराव होळकर महामेष योजनेअंतर्गत मेंढी पालनासाठी भरीव निधीची तरतूद केली असणे, प्रकल्पबाधित मच्छीमारांना नुकसान भरपाई देण्यासाठी व मच्छीमार कुटुंबीयांच्या कल्याणासाठी प्रकल्पाच्या २% किंवा कमाल ५ कोटी रकमेचा मत्स्य विकास कोष स्थापन करण्यात येणे, मच्छीमारांना डिझेल अनुदानासाठी असलेली यांत्रिक नौकेच्या कमाल १२० अश्वशक्तीच्या इंजिनाची मर्यादा काढल्याने सुमारे ८५ हजारापेक्षा अधिक मच्छीमारांना या योजनेचा लाभ मिळणे, केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजने अंतर्गत २७ प्रकल्पांना आणि बळीराजा जलसंजीवनी योजने अंतर्गत ९१ प्रकल्पांना मंजुरी देण्यात येणे, परिणामी अनुक्रमे ३ लाख २७ हजार हेक्टर सिंचन क्षमता आणि १ लाख ७३ हजार हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली असणे, शेत जमिनीचा ताबा आणि मालकी हक्क मिळविताना होणारे आपापसातील वाद मिटविताना जमिनीच्या अदलाबदल दस्तावरील मुद्रांक शुल्कात कपात करून ते नाममात्र एक हजार रुपये आणि नोंदणी शुल्क एक हजार रुपये करण्यासंदर्भात "सलोखा योजना" राबविण्यात येणे, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आणि विविध विभागीय योजनांचे अभिसरण करून 'सुविधा संपन्न कुटुंब मिशन' आणि 'सर्वांगीण ग्राम संस्कृती योजना' राबविण्यात येणे, प्रशासनातील अधिकारी व पदाधिकारी यांनी संपूर्ण एक दिवस शेतकऱ्यांसोबत राहून शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेण्यासाठी 'माझा एक दिवस, माझ्या बळीराजासाठी' हा उपक्रम राबविण्यात येणे, पूरक  व्यवसाय म्हणून मोठ्याप्रमाणावर शेतकरी दूध उत्पादनाकडे वळले असणे, अशा शेतकऱ्यांच्या बाबतीत मदतीची भूमिका घेऊन शासनाने दूध दर वाढविण्याबाबत निर्णय घेतला असणे, शासनाच्या या योजनांचा तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत लाभ मिळण्यासाठी या योजना अधिक कार्यक्षम करण्याची व त्यायोगे महाराष्ट्राला अधिकाधिक समृद्धीकडे नेण्यासाठी 'एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' या उक्तीप्रमाणे करावयाची कार्यवाही व उपाय योजना"

**दहा : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

(१) **सर्वश्री रमेश पाटील,** रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, **वि.प.स**

"**नवी मुंबईतील सिडको वसाहतीतील इमारतींचे अभिहस्तांतरण रखडलेबाबत**" या विषयावरील **श्री.बाळाराम दत्तात्रेय पाटील, वि.प.स.** यांचा दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक ८ मधील अता. प्र.क्र.१५७९३ ला दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**(२) सर्वश्री सुनिल शिंदे,** विलास पोतनीस, आमश्या पाडवी, **वि.प.स**

"**मुंबईतील विक्रोळी परिसरात सिद्धीविनायक सोसायटीची पार्किंग लिफ्ट कोसळून घडलेल्या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या कामगारांच्या वारसदारांना अपघात नुकसान भरपाई मिळण्याबाबत**" या विषयावरील **श्री.सुनिल शिंदे व इतर वि.प.स.** यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक १६९६५ ला दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १७ जुलै , २०२३

**जितेंद्र भोळे**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद